# **उत्तम बंडू तुपे** : तीव्र समाजभान असणारे लेखक

***प्रदीप बबनराव मोहिते***

मराठी विभागप्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर
pradeepmohite555@gmail.com



२०१९च्या डिसेंबर महिन्यात व्हॉटस्ॲपवर ख्यातनाम साहित्यिक *झुलवाकार* उत्तम बंडू तुपे यांना उपचारासाठी आर्थिक मदत करण्यासंदर्भात आवाहन करणारी पोस्ट वाचून मन कासावीस झाले.

१९८५ ते ९०च्या काळात आम्ही फर्ग्युसनचे निवडक साहित्यप्रेमी मित्र बालगंधर्वच्या कॅफेटेरियामध्ये नियमितपणे उत्तम बंडू तुपे यांना भेटत असू. तेव्हाचे बंडखोर विचारांच्या ऊर्जेने रसरसलेले, तावातावाने आपला मुद्दा पटवून देणारे, आक्रमक, मध्यम चणीचे, डोळ्यात बंडखोरीची चमक आणि छातीत शोषकांविरुद्ध दोन हात करण्याची धमक असलेले उत्तम बंडू तुपे मनःचक्षूंसमोर उभे राहिले. अशा हिंमतवान लेखकावर आजारपणात एकाकी पडून मदतीची याचना करण्याची वेळ यावी? त्यांच्या आवाहनाला त्वरेने प्रतिसाद दिला. अनेक मदतीचे हात पुढे आले. फोनवर त्यांच्याशी बोललो. त्यांचा क्षीण झालेला आवाज ऐकवेना. ‘आप्पा काळजी करू नका’, असे म्हणून फोन ठेवला. २६ एप्रिल २०२०ला त्यांचे निर्वाण झाले. मराठी साहित्यरसिक हळहळले.

ज्या झुलवाने मराठी साहित्य आणि नाट्यक्षेत्राला आपल्या अनोख्या रंगरूपाने अक्षरशः झुलवत ठेवले, काट्यावरच्या पोटातली विद्रोहाची आग किती दाहक असते, हे ज्यांनी दाखवून दिले त्या उत्तम बंडू तुपे यांचा जन्म मांग या उपेक्षित आणि सर्वहारा जातीत झाला. दोर-केरसुणी तयार करून पोट भरण्याची धडपड करणाऱ्या मांग जातीचे वास्तव *काट्यावरची पोटं* या त्यांच्या आत्मकथनामध्ये त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. प्रस्तुत आत्मकथनाच्या शीर्षकाचा बारकाईने विचार केला असता त्यामध्ये पोट या शब्दाचे 'पोटं' हे अनेकवचनी रूप वापरून

तुपे यांनी त्यास मांग जातीच्या प्रातिनिधिक स्वरूपात पेश केल्याचे लक्षात येते. म्हणजे हे आत्मकथन जितके तुपे यांचे आहे तितकेच ते मांग या जातीचेसुद्धा आहे आणि म्हणून हे आत्मकथन समाजविज्ञान, सांस्कृतिक इतिहास, मानवशास्त्र इत्यादी विषयांच्या अभ्यासकांसाठी संदर्भमूल्य असलेले आत्मकथन आहे. कथनातील प्रांजळपणा, गावरान व रांगडी भाषा, त्यांच्या साहित्यकृतींच्या शीर्षकांवरून एक ओझरता कटाक्ष टाकला तरी *इजाळ, झावळ, कोबारा, नाक्षारी किंबहुना माती आणि माणसं, लांबलेल्या सावल्या, पिंड, शेवंती आणि संतू* या शीर्षकांव्यतिरिक्त त्यांच्या सर्व साहित्यकृतींची शीर्षके ग्रामीण बोलीतील असल्याचे जाणवते. कुठलाही आडपडदा न ठेवता लैंगिक-वैवाहिक जीवनांगांवरसुद्धा मनमोकळेपणाने लेखकाने वाचकांशी साधलेला संवाद पाहून इतके कडू-गोड जीवनानुभव पचवलेले, अल्पशिक्षित उत्तम बंडू तुपे यांचे व्यक्तित्व चिंतनशील, बंडखोर आणि अनुभवांना प्रमाण मानणारे होते हे लक्षात येते. तुपे यांनी ऐंशीच्या दशकात लेखनास प्रारंभ केला. तोपर्यंत ते बिकट परिस्थितीशी दोन हात करत पोटासाठी भटकत होते. असेच भटकत भटकत ते पुण्यात आले. मुळारोडवरील झोपडपट्टीत राहून संपूर्ण पुणे-पिंपरी-चिंचवड परिसरात मिळेल ती हलकीसलकी कामे करू लागले. अशातच त्यांच्या जीवनात देशपांडे हे गृहस्थ आले. त्यांच्यामुळे तुपे वाचनाकडे आकृष्ट झाले. अण्णा भाऊंचे साहित्य त्यांनी अधाशासारखे वाचून काढले. अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचा तुपे यांच्यावर कमालीचा प्रभाव पडला आणि त्या प्रभावातून उत्तम बंडू तुपे या लेखकाचा जन्म झाला. जरी त्यांच्यावर अण्णा भाऊंचा प्रभाव पडला तरी तुपे यांच्या लेखनशैलीवर मात्र अण्णा भाऊंचा प्रभाव दिसून येत नाही, हे तुपे यांच्या साहित्याचे वेगळेपण आहे. त्यांच्या साहित्याची पृथगात्मता झुलवा या कादंबरीमध्ये ठळकपणे जाणवते. देवदासी, जोगतीण, झुलवा लावणे या अनिष्ट रूढींच्या विरूद्ध उभी राहिलेली जगन जोगतीण किंबहुना एकूणच कादंबरी कथानक आणि वास्तवाच्या दृष्टीने जितकी गंभीर आणि परिणामकारक आहे तितकीच नाट्यमय आहे. 'झुलवा'मधील नाट्यवत्तेकडे वामन केंद्रेंसारख्या मर्मज्ञ दिग्दर्शकाचे लक्ष गेले, चेतन दातारांनी मूळ कादंबरीतील केमिस्ट्रीला डायल्यूट न करता कादंबरीचे नाटक लिहून संहितात्मक माध्यमांतर केले आणि मग मराठी रंगभूमीवर *झुलवा* या नाट्यप्रयोगाने इतिहास घडवला. उत्तम बंडू तुपे यांना झुलवाकार उत्तम बंडू तुपे अशी नवी ‘ओळख’ मिळाली. *झुलवामुळे* सुकन्या कुलकर्णी यांची अभिनय कारकिर्द भरभराटीला आली.

तुपे यांनी तेरा कादंबऱ्या, चार लघुकथासंग्रह आणि एक आत्मकथन अशी विपुल वाङ्मयनिर्मिती केली. त्यांच्या लघुकथा अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, केशव मेश्राम यांच्या कथांच्या तोडीस तोड आहेत, असे विधान केल्यास अनुचित ठरू नये.

समाजातील भटके-विमुक्त, दलित, पीडित, शोषित, श्रमिक, शेतकरी आणि व्यवस्थेकडून शोषणाला बळी पडणाऱ्या स्त्रिया हे त्यांच्या साहित्याचे विषय होते. परिघाबाहेरचे हे वंचित समाजघटक साहित्याच्या केंद्रस्थानी आणणारे उत्तम बंडू तुपे हे अण्णा भाऊ साठे आणि बाबूराव बागूल यांच्यानंतरचे महत्त्वाचे असे भारतीय साहित्याचे निर्माते आहेत.

तर असे हे अस्सल वाङ्मयीन गुणवत्ता असलेले आणि उत्तम लेखक असलेले उत्तम बंडू तुपे जन्माला आले दारिद्र्यात, आयुष्यभर जगले दारिद्र्यात आणि गेलेसुद्धा दारिद्र्यात. त्यांच्या या दुरावस्थेला बऱ्याच अंशी आपण रसिक तर जबाबदार नाही ना, असा प्रश्न मनामध्ये उभा राहतो. मिर्झा गालिब, बालगंधर्व, गजानन माधव मुक्तिबोध, अण्णा भाऊ साठे या महामानवांनी आपल्या साहित्य आणि कलेच्या माध्यमातून रसिकांना तृप्त केले, श्रीमंत केले. मग अशा कलावंतांना त्यांच्या पडत्या काळात मदतीचा हात देऊन त्यांचे जीवन सुखी करण्यात आपण कमी पडतो हे वास्तव आहे. आजारपणात मदत करणे हे जितके महान आहे त्यापेक्षा कलावंताला सुखात ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहणे अधिक महान आहे.

हे साहित्यिक कलावंत जर रसिकांना 'मायबाप' म्हणत असतील तर त्यांना सुखात ठेवण्याची नैतिक जबाबदारी निश्चितच रसिकांची आहे.

तेव्हा आपल्या रसिकतेला मानवतेची जोड देऊन, जी वेळ उत्तम बंडू तुपे यांच्यावर आली ती इथून पुढे कोणत्याही लेखक - कलावंतावर येणार नाही, अशी खुणगाठ आपल्या रसिकमनाशी बांधणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल !